**ठेव संलग्न विमा योजनेचा लाभ**
**विनाविलंब अदा करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र. भनिनि-२००६/५६/प्र.क्र.७२/०६/१३-अ,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ७ नोव्हेंबर, २००७.

वाचा :- १) शासन परिपत्रक सा.प्र.वि. क्र. भनिनि १०९१/प्र.क्र.२६/९१/१३-अ, दि.२१/११/१९९२.

## -: परिपत्रक :-

निधन पावलेल्या भविष्य निर्वाह निधी वर्गणीदाराच्या वारसदारांना ठेव संलग्न विमा योजनेचा लाभ विनाविलंब मिळण्याच्या दृष्टीने प्रत्येक टप्प्यावर करावयाच्या कार्यवाहीसाठी कालमर्यादा संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये विहित करून देण्यात आलेली आहे. तसेच निधन पावलेल्या कर्मचा-यांच्या वारसदाराचा अर्ज येईपर्यंत वाट न पहाता शासकीय कर्मचारी मृत झाल्याची माहिती/ सूचना मिळाल्यानंतर कार्यालय प्रमुखाने यासंदर्भात कार्यवाही करण्यास सुरवात करावी, असेही परिपत्रकात स्पष्ट केलेले आहे. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही कार्यालय-प्रमुखांकडून या योजनेचा लाभ वर्गणीदाराच्या वारसदाराला दिला जात नाही अथवा तो विलंबाने दिला जातो.

सबब सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व कार्यालय प्रमुखांनी मृत शासकीय कर्मचा-यांच्या वारसदारांना ठेव संलग्न विमा योजनेखाली देय असलेली रक्कम विनाविलंब देण्याची कार्यवाही करावी अशा सूचना पुन्हा देण्यात येत आहेत. तसेच दि. २१ नोव्हेंबर, १९९२ च्या शासन परिपत्रकात दिलेल्या कालमर्यादा पाळल्या जातील याची दक्षता घ्यावी.

हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २००७११०७१३१८३५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(प्र. ल. पाठक)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

F:\old data\MehendaleG.P.F. paripatrak-2007

महालेखापाल-१( लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१० जादा प्रतीसह),
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१० जादा प्रतीसह),
महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (१० जादा प्रतीसह),
महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (१० जादा प्रतीसह),
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्यायशाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
वरीष्ठ उप महालेखापाल,भविष्य निर्वाह निधी शाखा, जुनी सी.जी.ओ. बिल्डींग, न्यु मरीन लाईन्स, १०१, मर्हषि कर्वे रोड,मुंबई-४०००२० (५० जादा प्रतींसह)
मुख्य लेखा परीक्षक, निवासी लेखे, कोकण भवन, नवी मुंबई,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
ग्राम विकास विभाग/नगर विकास विभाग/वित्त विभाग (कोषा-प्र-५), मंत्रालय,मुंबई,
मंत्रालयाचे इतर सर्व प्रशासनिक विभाग,
मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
मंत्रालय मध्यवर्ती ग्रंथालय, मंत्रालय, मुंबई (२ प्रती),
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती.

*पत्राने.